Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक १५] गुरुवार ते बुधवार, एप्रिल २३-२९, २०२६/वैशाख ३-९, शके १९४८ [पृष्ठे १८, किंमत : रुपये ८.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ-अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९१.

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक ०८ एप्रिल, २०२६.

**शुध्दीपत्रक**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-२५२३-१०१७-प्र.क्र. १३९-२०२३-ईपी प्रसिध्दी-नवि-३०.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३१ (१) मधील तसेच या अनुषंगिक शासनास असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन मूर्तिजापूर नगरपरिषद प्रारूप विकास योजनेस शासन अधिसूचना क्रमांक टिपीएस-२५२३-१०१७-प्र.क्र. १३९-२०२३-वि.यो. भागशः मंजुरी-नवि-३०, अन्वये दिनांक ०४ जून, २०२५ रोजी भागशः मंजुरी मिळाली असून सारभूत फेरबदलांबाबतची पुनर्प्रसिध्द विकास योजना शासन सूचना, नगर विकास विभाग क्रमांक टिपीएस-२५२३-१०१७-प्र.क्र. १३९-२०२३-ईपी प्रसिध्दी-नवि-३०, दिनांक ०४ जून, २०२५ अन्वये जनतेकडून सूचना / हरकती मागविण्याकरीता प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त सूचनेतील परिशिष्ट-ब मधील सूचीमध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार या शुध्दीपत्रकाद्वारे खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

शासन निर्णय क्रमांक टिपीएस-२५२३-१०१७-प्र.क्र. १३९-२०२३-ईपी प्रसिध्दी-नवि-३०, दिनांक ०४ जून, २०२५ रोजीच्या

अधिसूचनेसोबतच्या परिशिष्ट - ब मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. —

**या ऐवजी**

| वगळलेला भाग | स्थान | आरक्षण क्र. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ नुसार प्रसिद्ध विकास योजनेनुसारचा प्रस्ताव | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० नुसार शासनास मंजुरीसाठी सादर विकास योजनेनुसारचा प्रस्ताव | शासनाने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ (१) नुसार मंजूर केलेला फेरबदल |
|---|---|---|---|---|---|
| (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| EP-14 | Mouja Murtizapur Survey No. 10, 11 | Site No. 25, 26, 27 | Site No. 25, "Primary School and Playground" Site No. 26, "Playground" Site No. 27, "Library" | Site No. 25, "Primary School and Playground" Site No. 26, "Playground" Site No. 27, "Library" | Site No. 25, "Primary School and Playground" and Site No. 26, "Playground are proposed to be deleted and included in residential zone. Also area under Site No. 27- "Library" and Site No. 26, "Playground" is proposed to be reserved newly as Site No. 27, "Primary School and Playground". |

**असे वाचावे**

| वगळलेला भाग | स्थान | आरक्षण क्र. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ नुसार प्रसिद्ध विकास योजनेनुसारचा प्रस्ताव | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० नुसार शासनास मंजुरीसाठी सादर विकास योजनेनुसारचा प्रस्ताव | शासनाने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ (१) नुसार मंजूर केलेला फेरबदल |
|---|---|---|---|---|---|
| (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| EP-14 | Mouja Murtizapur Survey No. 10, 11 | Site No. 25, 26, 27 | Site No. 25, "Primary School and Playground" Site No. 26, "Playground" Site No. 27, "Library" | Site No. 25, "Primary School and Playground" Site No. 26, "Playground" Site No. 27 "Library" | Site No. 25, "Primary School and Playground" and part area of Site No. 26, "Playground are proposed to be deleted and proposed to be included in residential zone. Also area under Site No. 27- "Library" and part area under Site No. 26, "Playground" towards southerne side of Site No. 27, "Library" is proposed to be reserved newly as Site No. 27, "Primary School and Playground" as shown onplan. |

सदरची सूचना महाराष्ट्र शासनाचे **www.maharashtra.gov.in** (कायदे व नियम) या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने,

**प्रसाद रा. शिंदे,**
अवर सचिव.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९२.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT
MANTRALAYA, MUMBAI - 400 032, DATED 08th April, 2026.

THE MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966.

*CORRIGENDUM*

No. TPS-2523-1017-CR-139-2023-EP Publish-UD-30.—

Whereas, Development Plan of Murtizapur Municipal Council, Dist. Akola, has been sanctioned partly by Urban Development Department *vide* Notification No. TPS-2523-1017-CR-139-2023-DP Part Sanction-2020-UD-30, Dated the 04th June, 2025 and the Republished Development Plan of Murtizapur of excluded part of substantial nature has been published by the Government *vide* Urban Development Department's Notification No. TPS-2523-1017-CR-139-2023-EP Publish-UD-30, dated the 04th June, 2025 for inviting suggestions / objections.

And whereas, some errors are observed and needs to be corrected in the Schedule-B appended to the Notice published. Accordingly the correction is made as under:-

The following correction is made in Schedule-B, Development plan (Partly sanctioned) of published Notification No. TPS-2523-1017-CR-139-2023-EP Publish-UD-30, dated the 04th June, 2025.

INSTEAD OF

| Excluded Part | Location | Site No. | Proposal as per Development Plan published u/s 26 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. | Proposal as per Development Plan submitted to state Government for sanction u/s 30 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. | Proposal as sanctioned by the Government u/s 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. |
|---|---|---|---|---|---|
| (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| EP-14 | Mouja Murtizapur Survey No. 10, 11 | Site No. 25, 26, 27 | Site No. 25, "Primary School and Playground" Site No. 26, "Playground" Site No. 27, "Library" | Site No. 25, "Primary School and Playground" Site No. 26, "Playground" Site No. 27, "Library" | Site No. 25, "Primary School and Playground" and Site No. 26, "Playground" are proposed to be deleted and included in Residential Zone.<br>Also area under Site No.27- "Library" and Site No.26, "Playground" is proposed to be reserved newly as Site No.27, "Primary School and Playground". |

READ AS

| Excluded Part | Location | Site No. | Proposal as per Development Plan published u/s 26 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. | Proposal as per Development Plan submitted to state Government for sanction u/s 30 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. | Proposal as sanctioned by the Government u/s 31*(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. |
|---|---|---|---|---|---|
| (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| EP-14 | Mouja Murtizapur Survey No. 10, 11 | Site No. 25, 26, 27 | Site No. 25, "Primary School and Playground" Site No. 26, "Playground" Site No. 27, "Library". | Site No. 25, "Primary School and Playground" Site No. 26, "Playground" Site No. 27, "Library". | Site No. 25, "Primary School and Playground" and part area of Site No. 26, "Playground" are proposed to be deleted and proposed to be included in Residential zone. Also area under Site No.27- "Library" and Site No. 26, "Playground" is proposed to be reserved newly as Site No.27, "Primary School and Playgrond". |

This Notice shall also be made available on the *www.maharashtra.gov.in* (Acts / Rules).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRASAD R. SHINDE,
Under Secretary.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९३.

**संचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

**आदेश**

क्रमांक डि.टी.पी.-वि.यो. चांदूरबाजार (सु.)-कलम-१२७(२)-आदेश-टिपीव्ही- ६/१५२२.—

ज्याअर्थी, चांदूरबाजार नगर परिषदेची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधिले आहे) चे कलम ३१ (१) मधील तरतुदीनुसार शासनाच्या

नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टिपीएस-२८९९-४९-प्र. क्र. ३०-९९-नवि-३०, दिनांक ०१ मार्च, २००० (यापुढे " उक्त अधिसूचना " असे संबोधिली आहे) अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दिनांक ०२ मे, २००० पासून अंमलात आलेली आहे; (यापुढे “ उक्त मंजूर सुधारित विकास योजना " असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये, (i) आ. क्र. १९ “साईट ॲन्ड सर्व्हिसेस", (ii) आ. क्र. २० “उर्दू प्राथमिक शाळा" आणि (iii) आ. क्र. २३ “खेळाचे मैदान” ह्या आरक्षणांनी (यापुढे “उक्त आरक्षणे" असे संबोधिले आहे) मौजा चांदूरबाजार येथील स.नं. ७६ पै. व / ८० पै. ह्या जमिनींचे अंदाजे क्षेत्र अनुक्रमे ०.८८५० हे., ०.३६९६ हे., आणि ०.४४६४ हे. बाधित होत असल्याचे उक्त मंजूर सुधारित विकास योजना अहवालावरून दिसून येते आणि उक्त आरक्षणांचे भूसंपादन व विकासासाठी समूचित प्राधिकरण हे नगर परिषद, चांदूरबाजार आहे (यापुढे “उक्त समूचित प्राधिकरण” असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समूचित प्राधिकरणाने उक्त मंजूर सुधारित विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणांखालील जमिनींचे संपादन केलेले नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांखालील मौजा चांदूरबाजार येथील स.नं. ८०/२ या जमिनीचे उक्त आरक्षणांनी बाधित क्षेत्राबाबत ( यापुढे " उक्त जमीन " असे संबोधिले आहे) संबंधित जमीन मालकांचे वतीने (यापुढे “ उक्त जमीन मालक " असे संबोधिले आहे) ॲड. श्री. जी. के. मुंधडा यांनी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीन्वये उक्त समूचित प्राधिकरणावर दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी सूचना (यापुढे " उक्त सूचना " असे संबोधिले आहे) बजावली असून, ती चांदूर बाजार नगर परिषदेस दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी प्राप्त झाली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समूचित प्राधिकरणाने, विहीत मुदतीत उक्त आरक्षणांखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त जमिनीचे संपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७(१) मधील तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन मालकांनी मा. उच्च न्यायालय-मुंबई, नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ५५०८/२०१७ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक २४ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या निर्णयान्वये (यापुढे “ उक्त निर्णय " असे संबोधिले आहे) उक्त जमिनीचे बाधित क्षेत्रावरील उक्त आरक्षणे उक्त अधिनियमाचे कलम १२७ मधील तरतुदीनुसार व्यपगत झाल्याचे घोषित केले आहे;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, चांदूर बाजार यांनी पत्र क्र. ३०६/२०२५, दिनांक २४ जून, २०२५ अन्वये, उक्त निर्णयानुसार उक्त आरक्षणे व्यपगत होत असल्याने उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे तरतुदींतर्गतचे आदेश प्रसिध्द करणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी पत्र क्र. १११०, दिनांक २७ नोव्हेंबर, २०२५ अन्वये, उक्त निर्णयानुसार उक्त आरक्षणे व्यपगततेसंदर्भाने संचालनालयाचे स्तरावरून उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये आदेश निर्गमित करणे उचित होईल, असा अहवाल सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीचे मोजणी नकाशा 'ब' (मो.र.नं. १०३९/२०२१, दिनांक २४ डिसेंबर, २०२१ आणि उक्त मंजूर सुधारित विकास योजना नकाशा ह्या दोन्हींचे तुलनेंती प्रकरणी सहायक संचालक, नगर रचना, अमरावती शाखा, अमरावती कार्यालयाने सादर केलेल्या भाग नकाशावर नमूद केलेनुसार, उक्त जमिनीचे अनुक्रमे ०.३२१२ हे., ०.२८०६ हे. आणि ०.४८७८ हे. क्षेत्रावरील उक्त आरक्षणे भागशः व्यपगत होत असल्याचे निदर्शनास येत आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणांबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती विचारात घेता, पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त जमिनीचे बाधित क्षेत्रावरील उक्त आरक्षणे उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये भागशः व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्र. टिपीएस १८१३-३२११-प्र.क्र. ५०८-नवि-१३, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगरपरिषदा / नगर पंचायती / जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना

संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणे भागशः व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे-

उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :-

**परिशिष्ट**

| अ.क्र. | नगर परिषद मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त आरक्षणे व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र (हे.) | उक्त जमिनीचा तपशील | व्यपगत झालेल्या उक्त आरक्षणांखालील (भागशः) अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) (हे.) |
| १. | चांदूरबाजार नगर परिषद, मौजा चांदूर बाजार, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती. | आ. क्र. १९ " साईट ॲन्ड सर्व्हिसेस ", (क्षेत्र ०.८८५० हे.) | स.क्र.८०/२* (भाग) | ०.३२१२ हे. |
| २. | | आ. क्र. २० " उर्दू प्राथमिक शाळा " (क्षेत्र ०.३६९६ हे.) | | ०.२८०६ हे. |
| ३. | | आ. क्र. २३ " खेळाचे मैदान " (क्षेत्र ०.४४६४ हे.) | | ०.४८७८ हे. |

**टीप :-**

१. *सदरचा आदेश हा प्रस्तावासोबतचे दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजीच्या मोजणी नकाशा (ब-प्रत) छायाप्रतीच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे. संबंधित जमीन धारक / अर्जदार यांनी त्यांचे सूचनेअंतर्गत जागेचा अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सादर केलेला नसल्याने सदर आदेशात नमूद असलेल्या बाधित क्षेत्राबाबत भविष्यात कोणताही वाद अगर तक्रार उद्‌भवल्यास, त्यास संबंधित जमीन धारक / अर्जदार हे स्वतः जबाबदार राहतील.

२. * सदर आदेशाच्या अनुषंगाने भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित अर्जदार / जमीन धारकांनी सूचनेखालील त्यांचे जागेचा संबंधित भूमी अभिलेख विभागाकडील अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सहायक संचालक, नगर रचना, अमरावती शाखा कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक राहील.

३. उक्त आरक्षणामधून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर सुधारित विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकांना उपलब्ध होईल.

४. उक्त आरक्षणामधून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर सुधारित विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, नगर परिषद, चांदूरबाजार, जि. अमरावती यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

५. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**जितेंद्र ल. भोपळे,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक २४ मार्च, २०२६.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९४.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*ORDER*

No. D.T.P-D.P. Chandur Bazar (R)-Sec-127(2)-Order-TPV-VI-1522.—

Whereas, the Revised Development Plan of Chandur Bazar Municipal Council has been sanctioned as per the provisions of Section 31 *(1)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS- 2899-49-CR-30-99-UD-30, dated 01st March, 2000 (hereinafter referred to as "the said Notification") & has come into force with effect from dated 02nd May, 2000 (hereinafter referred to as "the said Sanctioned Revised Development Plan");

And whereas, in the said Sanctioned Revised Development Plan, areas admeasuring approximately 0.8850 Ha; 0.3696 Ha; and 0.4464 Ha. of the lands bearing S. No. 76 pt. & / 80 pt. of Mouza Chandur Bazar are affected by (i) Reservation No. 19 "Site & Services", (ii) Reservation No. 20 "Urdu Primary School" and (iii) Reservation No. 23 "Play Ground" respectively (hereinafter referred to as "the said Reservations") and the Planning and Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservstions is Municipal Council, Chandur Bazar (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the land affected by the said Reservations have not been acquired by the said Appropriate Authority within 10 (Ten) years from the date on which the said Sanctioned Revised Development Plan has come into force;

And whereas, on behalf of the concerned land owners (hereinafter referred to as "the said Land Owners"), Adv. Shri. G. K. Mundada had served a notice (hereinafter referred to as "the said Notice") as per the provisions of section 127*(1)* of the said Act in respect of area of the Land bearing S. No. 80/2 (hereinafter referred to as "the said Land"), affected by the said Reservations on the said Appropriate Authority on 19th January, 2015 and same has been received by said Appropriate Authority on 23rd January, 2015;

And whereas, the said Land under the said Reservations is not acquired or no steps as required as per the provisions of Section 127 *(1)* of the said Act have been taken by the Appropriate Authority within the stipulated period from the date of service of the said notice by the said land owner as per the provisions of Section 127 of the said Act;

And whereas, in the writ petition No. 5508/2017 filed by the said Land Owners in the Hon'ble High Court, Mumbai, Nagpur Bench, the Hon'ble High Court has by decision dated 24th February, 2018 (hereinafter referred to as "the said Decision"), the said Reservations on the area affected of the said land declared to have been lapsed as per the provisions of Section 127 of the said Act;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Chandur Bazar *vide* letter No. 306/2025, dated 24th June, 2025, has submitted the proposal to publish the order under the provisions of Section 127 of the said Act as the said Reservations have been lapsed as per the said decision;

And whereas, the Joint Director of Town planning, Amravati Division, Amravati *vide* letter No. 1110, dated 27th November, 2025, has submitted report that, it is necessary to issue order under the provisions of Section 127 of the said Act as per the said decision for lapsing of the said Reservations on Directorate level;

And whereas, after comparing the Measurement Plan 'B' (M. R. No. 1039/2021, dated 24th December, 2021) and the said Sanctioned Revised Development Plan; it is noticed, that the said reservations on the areas admeasuring 0.3212 Ha., 0.2806 Ha. and 0.4878 Ha. respectively have been partially lapsed as mentioned on the part plan submitted by office of the Assistant Director of Town Planning, Amravati Branch, Amravati;

And whereas, the above facts in respect of the said Reservations on the said Land, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion. that, it is necessary to issue the order under provisions of Section 127*(2)* of the said Act, regarding the partial lapsing of the said Reservations on the areas affected of the said Land;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, *vide* Resolution No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 01st December, 2016, has delegated the powers exercisable by it as per the provisions of Section 127 *(2)* of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the partial lapsing of the said Reservations in respect of the said land as per the provisions of Section 127*(2)* of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Revised Development Plan, as follows-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Revised Development Plan, the following new entry shall be added :-

SCHEDULE

| Sr. No. | Municipal Council, Mouza, Taluka and District | Proposal in the said sanctioned Revised Development Plan & its Approxi. Area as per D.P. Report | Description of the Land | Approximate Area under lapsing of the said Reservations (Partially) (Ha.) |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1. | Chandur Bazar Municipal Council, Mouza Chandur Bazar, Tal. Chandur Bazar, Dist. Amravati. | Reservation No. 19 "Site & Services" (Area 0.8850 Ha.) | S.No. 80/2* (Part) | 0.3212 Ha. |
| 2. | | Reservation No. 20 "Urdu Primary School" (Area 0.3696 Ha.) | | 0.2806 Ha. |
| 3. | | Reservation No. 23 "Play Ground" (Area 0.4464 Ha.) | | 0.4878 Ha |

*Note*:-

1. *The said order is being issued subject to the photocopy of demarcation map (B- Copy) dated 24th December, 2021 alonwith proposal. As the concerned land owners /applicant. have not submitted the updated and certified demarcation map of their lands under notice, they will be responsible for any future dispute or complaint regarding the affected areas mentioned in this order.

2. *Before certifying the part plan in pursuance of the said order, the concerned land owners applicant shall be required to submit an updated and certified demarcation map from Land Records Department of his land under the notice to Assistant Director of Town Planning, Amravati Branch.

3. The said land so released from the said Reservation shall become available to the said Land Owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Sanctioned Revised Development Plan.

4. A copy of the part plan of the said Sanctioned Revised Development Plan showing the area of the said land which is lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Chandur Bazar, District Amravati during office hours on all working days for inspection to public upto one month.

5. This Order shall also be published on the Directorate's official website *www.dtp.maharashtra gov.in.*

JITENDRA L. BHOPLE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 24th March, 2026.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९५.

**सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती तथा सहसंचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

**अधिसूचना**

क्रमांक. प्रा.यो.यवत.-मौ.किन्ही, गट नं. १३७ व इतर -कलम-२० (४)-सभा क्र.३२-२०२६-सहसंनरअम-१३२.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्यास " उक्त अधिनियम " असे संबोधले आहे) मधील तरतूदीनुसार यवतमाळ जिल्ह्याची प्रादेशिक योजना (यापुढे ज्यास " उक्त प्रादेशिक योजना " असे संबोधले आहे) शासनाने दिनांक ०१ जानेवारी, २०१८ रोजी मंजूर केली असून ती दिनांक ०२ मार्च, २०१८ पासून अंमलात आलेली आहे. तसेच उक्त प्रादेशिक योजनेअंतर्गत “ किन्ही ” विकास केंद्राचा (यापुढे " उक्त विकास केंद्र " असे संबोधिले आहे) प्रस्तावित जमीन वापर नकाशा संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. डिटीपी-प्रायो-यवतमाळ-यवतमाळ ग्रोथ सेंटर नकाशे-टिपीव्ही-६-६१४०, दिनांक १३ डिसेंबर, २०१९ अन्वये मंजूर असून तो दिनांक ०७ मार्च, २०२० पासून अंमलात आलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेनुसार मौजे किन्ही, ता. जि. यवतमाळ येथील गट क्र. १३७ (पै), १३८, १३९ व १४३ क्षेत्र एकूण १६.८५ हे. आर. जमीन (यापुढे ज्यास "उक्त जमीन" असे संबोधले आहे) ही शेती विभागात समाविष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये उक्त अधिनियमाचे कलम २० अन्वये वेळोवेळी कराव्या

लागणाऱ्या जमीन वापराच्या फेरबदलासंदर्भाने करावयाच्या कार्यपध्दती बाबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये शासन निर्णय क्र. टिपीएस- १८१५-प्र. क्र. ४९-१५-नवि-१३, दिनांक ०६ मे, २०१५ व दिनांक ०४ जानेवारी, २०१६ अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत, (यापुढे ज्यास " उक्त शासन निर्णय " असे संबोधले आहे), व त्याअनुषंगाने शासनाने " प्रस्ताव छाननी समिती " गठीत केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २० पोट-कलम (२) मधील तरतुदीनुसार, उक्त जमीन ( एकूण क्षेत्र १६.८५ हे.आर. पैकी मोजणी नकाशानुसार रस्त्याखालील क्षेत्र वगळता उर्वरित क्षेत्र १६.५४ हे. आर ), " शेती विभागातून " वगळून, खालील अटींच्या अधीन राहून, " रहिवास विभागात " समाविष्ट करण्याचे प्रस्तावित असून, त्या अनुषंगाने उक्त प्रादेशिक योजना सुधारित करणे आवश्यक आहे (यापुढे ज्यास " उक्त फेरबदल " असे संबोधले आहे), असे उक्त शासन निर्णयान्वये गठीत " प्रस्ताव छाननी समिती " चे मत झाले आहे :-

**अटी :-**

१) शासनाच्या नगर विकास विभागाकडील दिनांक ०४ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयात नमूद प्रमाणे प्रस्तुतच्या विभाग बदलासाठी आवश्यक ते अधिमूल्य व इतर शुल्क भरणा करणे अर्जदार/जमीन मालक / विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहील.

२) दिनांक ०६ मे, २०१५ व दिनांक ०४ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयात व त्यासोबतच्या सहपत्रात नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार उक्त जमिनीचा विकास करणे बंधनकारक राहील.

३) सदरची परवानगी म्हणजे मालकी हक्काबाबत प्रमाणिकरण नाही. उक्त जमिनींच्या मालकी हक्काबाबत भविष्यात काही वाद उद्‌भवल्यास त्यास सर्वस्वी अर्जदार / जमीन मालक / विकासकर्ते हे जबाबदार राहतील.

४) उक्त जमिनींचे कोणत्याही क्षेत्रावर विकसन करताना, मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील प्रादेशिक योजनेसाठीचे तरतुदीनुसार, किमान १०% मनोरंजनात्मक खुली जागा व किमान १०% सुविधा क्षेत्र सोडणे बंधनकारक राहील.

५) फेरबदलाखालील क्षेत्रात पायाभूत सुविधा अर्जदार / जमीन मालकांनी / विकास कर्त्यांनी स्वतःच्या खर्चाने विकसित करणे व पुरविणे बंधनकारक राहील. तसेच उक्त जमिनीचे विकसन करतांना व विकास पश्चात तेथील पाणीपूरवठा, सांडपाणी व्यवस्था, घनकचरा विल्हेवाट / व्यवस्थापन यांकरिता योग्य ती स्वयंपूर्ण व्यवस्था अर्जदार यांनी करणे आवश्यक राहील.

६) अद्ययावत STP, Rainwater Harvesting, Water Recycling (पाण्याचा पुनर्वापर) व Solar Energy अशा स्वरुपाच्या संकल्पना उक्त जमिनीचे विकसन करतांना अंमलात आणण्यात याव्यात.

७) उक्त जमिनीवर अर्जदार/जमीन मालक / विकसनकर्ते यांनी जागेचे विकसन करतांना प्रती हेक्टरी २५० वृक्ष लावणे बंधनकारक राहील. सदरची बाब विकसनास अंतिम मंजूरी देतांना पडताळणी करण्यात यावी.

८) उक्त जमिनीपैकी ग.क्र. १४३ चे मोजणी नकाशावरील नोंदीनुसार पुर्वेकडील गटातील जमिन तलावासाठी संपादीत केल्याचे दिसून येते. सबब प्रस्तुत जमिनीच्या विकासाचे वेळी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ३.१.१२ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

९) उक्त जमिनीवरील अभिन्यासातील भूखंड / सदनिका यांची विक्री खालील तक्त्यानुसार करणे बंधनकारक राहील.—

**तक्ता**

**अभिन्यासातील भूखंड/ सदनिका यांची सुविधांच्या विकसनाची सांगड**

| | | | |
|---|---|---|---|
| अ | अभिन्यास अंतिमतः मंजूर झाल्यावर | - | एकूण २५% भूखंड/ सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| ब | सुमारे ४०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | - | एकूण ५०% भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| क | सुमारे ६०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | - | एकूण ७५% भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| ड | सुमारे ८०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | - | एकूण ९०% भूखंड/ सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| इ | सुमारे १००% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | - | एकूण १००% भूखंड/ सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |

१०) फेरबदलाखालील जमिनी मध्ये समूह गृह बांधणी योजना विकसित करावयाची असेल तर, जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी विहित केल्यानुसार सर्व मुलभुत सुविधा विकसित झाल्याशिवाय / विकासकर्ते यांना भोगवटा प्रमाणपत्र देता येणार नाही.

११) प्रस्तावांतर्गत जमिनींपैकी गट नं. १३९ (पै.) व गट नं. १३८ (पै.) चे क्षेत्रामध्ये १ : ५ पेक्षा तीव्र उतार असलेल्या जमिनीवर कोणत्याही स्वरुपाचे विकसन अनुज्ञेय होणार नाही. प्रस्तावाखालील जागेचे विकसन करतांना क्षेत्रांतर्गत जागेची नैसर्गिक भूपृष्ठीय रचना, कंटूर या बाबी विचारात घेऊन अभिन्यासाची व त्या अंतर्गत रस्त्यांची आखणी नियोजित करणे आवश्यक राहील.

१२) कलम २०(४) ची अधिसूचना निर्गमित करणेस मान्यता मिळालेपासून एक वर्षाचे आत अधिमूल्याची रक्कम न भरलेस सदर क्षेत्र फेरबदलाचा प्रस्ताव नामंजूर करणेत येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २० पोट-कलम (३) च्या तरतुदीनुसार शासन निर्णय क्र. प्रा.यो. यवत-मौ. किन्ही गट नं. १३७ व इतर-कलम-२० (३)-सभा क्र. ३१-२०२५-सहसनर अम-०९, दिनांक ०८ जानेवारी, २०२६ अन्वये प्रस्तावित फेरबदलाबाबत नागरीकांकडून हरकती व सूचना दाखल करणाऱ्याना सुनावणी देण्याकरीता व सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती तथा सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांना अहवाल सादर करण्याकरिता " अधिकारी " (यापुढे " उक्त अधिकारी " असे संबोधिले आहे) म्हणून सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, यवतमाळ यांची नियुक्ती करण्यात आली होती;

आणि ज्या अर्थी, नियुक्त अधिकाऱ्याने त्यांच्या क्र. १४५, दिनांक ०६ मार्च, २०२६ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती यांना सादर केलेला आहे;

आणि ज्या अर्थी, उक्त समितीचे दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी झालेल्या सभेमध्ये नियुक्त अधिकाऱ्याच्या प्राप्त अहवालानुसार सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती आणि समिती सदस्यांशी सल्लामसलत केल्यानंतर, उक्त प्रादेशिक योजनेत 'उक्त जमीन' शेती विभागातून वगळून काही अटींच्या अधिन राहून रहिवास विभागात समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे समितीचे मत झाले आहे;

आणि ज्या अर्थी, शासनाच्या वापर बदलाच्या धोरणानुसार मौजे किन्ही ता. जि. यवतमाळ येथील गट क्र. १३७ (पै.), १३८, १३९, व १४३, क्षेत्र एकूण १६.५४ हे. आर. क्षेत्रासाठी, जमीन मालक यांनी जमीन वापर बदलाचे अधिमुल्य शासकीय लेखाशिर्षांत दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी जमा केले असल्याने उक्त अधिनियमाचे कलम- २०(३), दिनांक ०८ जानेवारी, २०२६ चे सूचनेतील अट क्र. १ व १२ ची पूर्तता झाली आहे;

आणि ज्या अर्थी शासनाचे निर्णय क्र. टिपीएस-१८१५-प्र.क्र. ४९-१५-नवि-१३, दिनांक ११ जून, २०१५ अन्वये संबंधित विभागीय सहसंचालक, यांना उक्त अधिनियमाचे कलम २० (४) अन्वये अधिसूचना निर्गमित करण्याचे अधिकार प्रत्यायोजित करण्यात आले आहेत;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम २० चे पोट-कलम (४) व त्यानुषंगाने प्राप्त अधिकारांचा वापर करुन सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती उक्त जमिनीबाबत प्रस्तावित फेरबदलास पुढील प्रमाणे मंजूरी देत आहेत व त्यासाठी प्रादेशिक योजना, यवतमाळ मंजुरीची दि. ०१ जानेवारी, २०१८ ची अधिसूचना पुढील प्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

उक्त प्रादेशिक योजना यवतमाळ मंजूरीच्या अधिसुचनेच्या फेरबदल नोंदीखालील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

**नोंद**

" प्रादेशिक योजना यवतमाळ अंतर्गत मौजे किन्ही ता. जि. यवतमाळ येथील गट क्र. १३७ (पै.), १३८, १३९ व १४३ क्षेत्र एकूण १६.५४ हे. आर. जमीन ही खालील अटींच्या अधीन राहून शेती विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे. "

**अटी :-**

१) दिनांक ०६ मे, २०१५ व दिनांक ०४ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयात व त्यासोबतच्या सहपत्रात नमूद केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार उक्त जमिनीचा विकास करणे बंधनकारक राहील.

२) सदरची परवानगी म्हणजे मालकी हक्काबाबत प्रमाणिकरण नाही. उक्त जमीनींच्या मालकी हक्काबाबत भविष्यात काही वाद उद्‌भवल्यास त्यास सर्वस्वी अर्जदार/ जमीन मालक / विकासकर्ते हे जबाबदार राहतील.

३) उक्त जमिनींचे कोणत्याही क्षेत्रावर विकसन करताना, मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील प्रादेशिक योजनेसाठीचे तरतुदीनुसार, किमान १०% मनोरंजनात्मक खुली जागा व किमान १०% सुविधा क्षेत्र सोडणे बंधनकारक राहील.

४) फेरबदलाखालील क्षेत्रात पायाभूत सुविधा अर्जदार / जमीन मालकांनी / विकास कर्त्यांनी स्वतःच्या खर्चाने विकसित करणे व पुरविणे बंधनकारक राहील. तसेच उक्त जमिनीचे विकसन करतांना व विकास पश्चात तेथील पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था,

घनकचरा विल्हेवाट / व्यवस्थापन यांकरिता योग्य ती स्वयंपूर्ण व्यवस्था अर्जदार यांनी करणे आवश्यक राहील.

५) अद्ययावत STP, Rainwater Harvesting, Water Recycling (पाण्याचा पुनर्वापर ) व Solar Energy अशा स्वरुपाच्या संकल्पना उक्त जमिनीचे विकसन करतांना अंमलात आणण्यात याव्यात.

६) उक्त जमिनीवर अर्जदार/जमीन मालक / विकसनकर्ते यांनी जागेचे विकसन करतांना प्रती हेक्टरी २५० वृक्ष लावणे बंधनकारक राहील. सदरची बाब विकसनासअंतिम मंजूरी देतांना पडताळणी करण्यात यावी.

७) उक्त जमिनीपैकी ग.क्र. १४३ चे मोजणी नकाशावरील नोंदीनुसार पुर्वेकडील गटातील जमीन तलावासाठी संपादित केल्याचे दिसुन येते. सबब प्रस्तुत जमिनीच्या विकासाचे वेळी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ३.१.१२ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

८* उक्त जमिनीवरील अभिन्यासातील भूखंड/ सदनिका यांची विक्री खालील तक्त्यानुसार करणे बंधनकारक राहील.—

**तक्ता**

**अभिन्यासातील भूखंड/ सदनिका यांची सुविधांच्या विकसनाची सांगड**

| | | | |
|---|---|---|---|
| अ | अभिन्यास अंतिमतः मंजूर झाल्यावर | - | एकूण २५% भूखंड/ सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| ब | सुमारे ४०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | - | एकूण ५०% भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| क | सुमारे ६०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | - | एकूण ७५% भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| ड | सुमारे ८०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | - | एकूण ९०% भूखंड/ सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| इ | सुमारे १००% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | - | एकूण १००% भूखंड/ सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |

९) फेरबदलाखालील जमिनी मध्ये समूह गृह बांधणी योजना विकसित करावयाची असेल तर, जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी विहित केल्यानुसार सर्व मूलभूत सुविधा विकसित झाल्याशिवाय / विकासकर्ते यांना भोगवटा प्रमाणपत्र देता येणार नाही.

१०) प्रस्तावांतर्गत जमिनींपैकी गट नं. १३९ (पै.) व गट नं. १३८ (पै.) चे क्षेत्रामध्ये १:५ पेक्षा तीव्र उतार असलेल्या जमिनीवर कोणत्याही स्वरुपाचे विकसन अनुज्ञेय होणार नाही. प्रस्तावाखालील जागेचे विकसन करतांना क्षेत्रांतर्गत जागेची नैसर्गिक भूपृष्ठीय रचना, कंटूर या बाबी विचारात घेऊन अभिन्यासाची व त्या अंतर्गत रस्त्यांची आखणी नियोजित करणे आवश्यक राहील.

०२) सदरची अधिसूचना व मंजूर फेरबदल दर्शविणारा नकाशा खालील कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत ३० दिवसांच्या कालावधीकरीता सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

१) सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती, “निलगिरी” डॉ. अग्रवाल यांची ईमारत, कॉंग्रेस नगर रोड, अमरावती.

२) सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ, प्रशासकीय इमारत, तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, यवतमाळ.

०३) प्रस्तुत अधिसूचना **www.dtp.maharashtra.gov.in** (Division Offices) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**ओवैस ए. मोमीन,**

सदस्य सचिव,
प्रस्ताव छाननी समिती
तथा
सहसंचालक, नगर रचना,
अमरावती विभाग, अमरावती.

अमरावती :
दिनांक ०८ एप्रिल, २०२६.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९६.

BY MEMBER SECRETARY, PROPOSAL SCRUTINY COMMITTEE AND JOINT DIRECTOR OF TOWN PLANNING

THE MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966.

*NOTIFICATION*

No. R.P. Yavt.-Mou. Kinhi, Gut No.137 & others-kalam-20(4)-Meeting No.32-2026- JDTPAMT-132.—

Whereas; the Government has sanctioned the Regional Plan for Yavatmal District on 01st January, 2018 (hereinafter referred to as " the said Regional Plan ") under the provisions of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act") and has came into force with effect from 02nd March, 2018. Also the proposed land use plan of Kinhi Growth centre (hereafter referred in as the "said Growth Centre") within the said Regional Plan has been sanctioned by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* Notification No. DTP-RP-Yavatmal-Yavatmal Growth Centre Plans-TPV-6-6140, dated 13th December, 2019 and has came into force with effect from 07th March, 2020;

And whereas, in the said Regional Plan, the land admeasuring area 16.85 H.R, bearing Gut Nos. 137(Part), 138, 139 & 143 of Mouje Kinhi, Tal. Dist. Yavatmal, (hereinafter referred to as the " said Land ") is included in Agricultural Zone;

And whereas, the Government *vide* Resolution No. TPS-1815-C.R. 49-15-UD-13, dated 06th May, 2015 and dated 04th January, 2016 (hereinafter referred to as " the said Government Resolutions ") has issued the directives under section 154 of the said Act, regarding the procedure to be followed under section 20 of the said Act, for making changes in the use of land in the areas of sanctioned Regional Plans and for that purpose constituted "Proposal Scrutiny Committee ";

And whereas, the " Proposal Scrutiny Committee " constituted under the said Government Resolution, is of the opinion that, the said land (Remaining 16.54 H.R. area excluding Road as per measurement plan from the total area 16.85 H.R) shall be deleted from 'Agriculture Zone' and proposed to be included in 'Residential Zone', and accordingly it is necessary to modify the said Regional Plan (hereinafter referred to as "the said modification") in accordance with the provisions of sub-section *(2)* of section 20 of the said Act, subject to the following conditions:-

*Conditions :-*

1) It shall be binding on the Applicant / Land Owner / Developer to Pay Premium and other necessary charges as decided by the Government Resolution dated 04th January, 2016.

2) It shall be binding to develop the said land as per the guidelines mentioned in Government Resolutions dated 06th May, 2015 and 04th January,2016 and Annexures with it.

3) This permission does not confirm ownership of the said land. The Applicant / Land Owner/ Developer will be completely responsible regarding any issue about ownership of the said land.

4) While developing any portion of area of the said lands, it shall be binding to provide at least 10% open space and 10% amenity area as per the Regulations for Regional Plan in the approved Unified Development Control and Promotion Rules (UDCPR). 5) It shall be mandatory for the land Applicant/Land owner/Developer to develop and provide infrastructure at their own expense. Applicant/Land owner/Developer shall make necessary self contained arrangements to provide Water supply, Waste water treatment, Solid waste disposal /Management while developing & after development of the said land at his own cost.

6) The concepts like STP, Rainwater Harvesting, Water Recycling and Solar energy shall be implemented while developing the said land.

7) It shall be binding on Applicant/Land owner/Developer to plant 250 trees per Hect. This shall be verified at the time of final sanction to development permission.

8) As per the records on the measurement sheet of Gut No. 143, it is seen that, the land in the Eastern Gut No. has been acquired for a lake. It will be mandatory to *abide* by the provisions of Rule No. 3.1.12 of the Unified Development Control and Promotion Regulations at the time of development of the said land.

9) It shall be binding to sale layout plots/flats of the said land as per table given below. —

TABLE

*Corelation of layout plots/flats with development of basic infrastructure*

| | | | |
|---|---|---|---|
| A | After sanction final layout | - - | Sale of 25% of the total plots/flats shall be permissible. |
| B | After approximate 40% development of basic infrastructure | - - | Sale of 50% of the total plots/flats shall be permissible. |
| C | After approximate 60% development of basic infrastructure | - - | Sale of 75% of the total plots/flats shall be permissible. |
| D | After approximate 80% development of basic infrastructure | - - | Sale of 90% of the total plots/flats shall be permissible. |
| E | After approximate 100% development of basic infrastructure | - - | Sale of 100% of the total plots/flats shall be permissible. |

10) If the Group Housing Scheme is proposed in the layout, then, Occupancy Certificate shall not be issued unless all basic amenities are fully developed in the said land.

11) No development of any kind will be permitted on the land having a slope steeper than 1:5 in the area of Gut No. 139 (P) and Gut No. 138 (P) among the lands under the proposal and in land which is not suitable for construction. The development of land regarding the internal roads is to be done according to natural geography of the land, contour *etc.*

12) If the premium amount is not paid within one year from the date of approval for issuing the notification under Section 20*(4)*, the said modification proposal will be rejected.

And whereas, the notice for the Proposed Modification, under the powers conferred by section 20 *(3)* of the said Act, was published by the Member Secretary, Proposal Scrutiny Committee and Joint Director, Town Planning, Amravati Division, Amravati, *vide* Notice No. R.P.Yavt.-Mou. Kinhi, Gut No.137 & others-Meeting No. 31-2025-JDTPAMT-09, dated 08th January, 2026 inviting objections and suggestions from the general public, and the Assistant Director of Town Planning, Yavatmal Branch was appointed as the " Officer " (hereinafter referred to as the " said Officer ") to hear the suggestions / objections received within the stipulated period only and to submit his report on the same to the Member Secretary, Proposal Scrutiny Committee;

And whereas, the said Officer submitted his report to the Member Secretary, Proposal Scrutiny Committee *vide* his letter No. 145, dated 06th March, 2026;

And whereas, Proposal Scrutiny Committee's meeting held on 18th March, 2026 and after consulting the Member Secretary & committee members on the report of the said Officer, and the aforesaid Committee is of the opinion, that the said land should be deleted from Agricultural Zone and included in Residential Zone, subject to certain conditions;

And whereas, as per land use change policy of Government, the owners of the said land have deposited the premium for the total 16.54 H.R, bearing Gut No. 137 (P), 138, 139 & 143, of Mouje Kinhi, Tal. Dist.Yavatmal in the Government Treasury on 25th March, 2026; therefore, Conditions No. 1 and 12 of Notice under Section 20*(3)* of the said Act, dated 08th January, 2026, have been fulfilled;

And whereas, Government by Order No. TPS-1815-C.R.49-15-UD-13, Dated 11th June, 2015 has delegated power to the Joint Director of Town Planning of respective Division to issue notification under sub-section *(4)* of section 20 of said Act;

Now, therefore, in exercise of the power conferred under sub-section *(4)* of section 20 of the said Act, the Joint Director of Town Planning, Amravati Division, Amravati hereby sanctions the proposed Modification in respect of the said land and for that purpose amends the above referred Notification dated the 1st January, 2018 as follows.—

In the Schedule of Modification appended to the Notification dated 1st January, 2018 sanctioning the said Regional Plan the following new entry shall be added after the last entry.

*ENTRY*

" In the said Regional Plan, the land admeasuring total 16.54 H.R, bearing Gut No. 137 (P), 138, 139 & 143 of Mouje Kinhi Tal. Dist. Yavatmal is deleted from Agriculture Zone and included in Residential Zone subject to following conditions."

*Conditions:-*

1) It shall be binding to develop the said land as per the guidelines mentioned in Government Resolutions dated 06th May, 2015 and dated 04th January, 2016 and Annexures with it.

2) This permission does not confirm ownership of the said land. The Applicant / Land Owner Developer will be completely responsible regarding any issue about ownership of the said land.

3) While developing any portion of area of the said lands, it shall be binding to provide at least

10% open space and 10% amenity area as per the Regulations for Regional Plan in the approved Unified Development Control and Promotion Rules (UDCPR).

4) It shall be mandatory for the land Applicant/Land owner/Developer to develop and provide infrastructure at their own expense. Applicant/Land owner/Developer shall make necessary self contained arrangements to provide Water supply, Waste water treatment, Solid waste disposal /Management while developing & after development of the said land at his own cost.

5) The concepts like STP, Rainwater Harvesting, Water Recycling and Solar energy shall be implemented while developing the said land.

6) It shall be binding on Applicant/Land owner/Developer to plant 250 trees per Hect. This shall be verified at the time of final sanction to development permission.

7) As per the records on the measurement sheet of Gut No. 143, it is seen that, the land in the Eastern Gut No. has been acquired for a lake. It will be mandatory to *abide* by the provisions of Rule No. 3.1.12 of the Unified Development Control and Promotion Regulations at the time of development of the said land.

8) It shall be binding to sale layout plots/flats of the said land as per table given below.—

TABLE

*Corelation of layout plots/flats with development of basic infrastructure*

| | | | |
|---|---|---|---|
| A | After sanction final layout | - | Sale of 25% of the total plots/flats shall be permissible. |
| B | After approximate 40% development of basic infrastructure | - | Sale of 50% of the total plots/flats shall be permissible. |
| C | After approximate 60% development of basic infrastructure | - | Sale of 75% of the total plots/flats shall be permissible. |
| D | After approximate 80% development of basic infrastructure | - | Sale of 90% of the total plots/flats shall be permissible. |
| E | After approximate 100% development of basic infrastructure | - | Sale of 100% of the total plots/flats shall be permissible. |

9) If the Group Housing Scheme is proposed in the layout, then, Occupancy Certificate shall not be issued unless all basic amenities are fully developed in the said land.

10) No development of any kind will be permitted on the land having a slope steeper than 1:5 in the area of Gut No. 139 (P) and Gut No. 138 (P) among the lands under the proposal and in land which is not suitable for construction. The development of land regarding the internal roads is to be done according to natural geography of the land, contour etc.

02) The said notification and the plan showing the sanctioned modification shall be available for inspection by the general public during office hours at the following offices for a period of 30 days.

1) The Joint Director of Town Planning, Amravati Division, Amravati, "Nilgiri" Dr. Agrawal Building, Congress Nagar Road, Amravati.

2) The Assistant Director of Town Planning, Yavatmal Branch, Yavatmal Administrative Building, Ground Floor, Collector Office Premises, Yavatmal.

03) This Notification is also available on website *www.dtp.maharashtra.gov.in* (Division Offices).

OWAIS A. MOMIN,

Amravati :
Dated the 8th April, 2026.

Member Secretary,
Proposal Scrutiny Committee
and
Joint Director of Town Planning,
Amravati Division, Amravati.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.